जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ११७ दिनांक - १९/०२/२०२५**

काळेपडळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## काळेपडळ पोलीस स्टेशन व अन्न व औषध प्रशासन विभाग पुणे यांचे कडुन संयुक्तरित्या छापा कारवाई मध्ये एकुण ७६,४४,६५०/- रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा आरोपी कडुन जप्त

अन्न व औषध प्रसासन विभाग पुणे येथील गुप्त वार्ता विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी यांना प्राप्त माहिती वरुन,काळेपडळ पोलीस ठाणे कडील पथक असे संयुक्तरित्या वडाचीवाडी रोड घुले वस्ती उंड्री पुणे येथील गोडावुन वर जावुन, छापा टाकला असता,सदर गोडावुन मध्ये विविध माल वाहतुक गाडया मध्ये विविध ब्रॅडचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखु व पानमसाला गुटखा मोठया प्रमाणात मिळुन आल्याने, सदर ठिकाणी हजर असलेल्या इसम नामे संपतराज पेमाराम चौहान वय ३८ रा.इस्कॉन मंदिराच्या पाठीमागे,कोंढवा पुणे यास ताब्यात घेवुन,प्रतिबंधित माला बाबत चौकशी करुन,त्यांचे कडुन ६४,४४,६५०/-रूपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा व १२,००,०००/-रुपये किंमतीचे ४ पिकअप गाडया असा एकुण ७६,४४,६५०/-रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने, अन्न सुरक्षा अधिकारी विजयकुमार अंबादास उनवणे अन्न व औषध प्रशासन,विभाग पुणे यांनी आरोपी नामे संपतराज चौहान व इतर पाहीजे आरोपी याचे विरोधात काळेपडळ पोलीस ठाणे पुणे शहर येथे गुन्हा रजि.नं.२७/२०२५ भा.न्या.संहिता कलम १२३,२७४,२७५,२२३,३(५),अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम २६(२)(i),२६(२)(ii),२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a)नियमन ३.१.७, नियमन २.३.४,५९ अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपी नामे १) **संपतराज पेमाराम चौहान वय ३८ रा.इस्कॉन मंदिराच्या पाठीमागे,कोंढवा पुणे** यास अटक करण्यात आले आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक,अनिल निबांळकर करत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५ श्री.राजकुमार शिंदे,यांचे मागदर्शनाखाली मा.सहाय्यक पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे.श्री.धन्यकुमार गोडसे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,काळेपडळ पोलीस स्टेशन,पुणे शहर,श्री.मानसिंग पाटील,यांचे सुचने प्रमाणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.अमर काळंगे, सहा.पोलीस निरीक्षक प्रविण अब्दागिरे,पोलीस अमंलदार जाधव, पाटील,तसेच अन्न व औषध प्रशासन विभाग कडील अन्न सुरक्षा अधिकारी यांचे पथकाने केली आहे.


काळेपडळ पोलीस स्टेशन


Galaxy S24 Ultra